सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७

ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

---

**संकेतस्थळ /रजिस्टर एडी/ई-मेल द्वारे**

क्र.१८/तंशिसं/टॉप क्लास/२०२३-२४/२४४
दिनांक : २०/ १० /२०२३

प्रति,

पत्रातील संस्थांच्या यादीतील संस्थांचे प्राचार्य / संचालक /अधिष्ठाता,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- **सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांची दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजनांची शै. वर्ष २०२३-२४ साठीच्या अंमलबजावणीबाबत....**

संदर्भ :- १. सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. Z-११०१७/१००/ २०२३-SCH दि. ०४/१०/२०२३.

२. केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलवर **"स्कॉलरशिप फॉर टॉप क्लास एज्युकेशन फॉर स्टुडंटस् विथ डिसअ‍ॅबीलीटी" शिष्यवृत्ती योजनेच्या शै. वर्ष २०२३-२४ साठी** उपलब्ध असलेली मार्गदर्शिका.

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रान्वये मान्यताप्राप्त व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी/ पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांच्या यादीतील सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता यांना कळविण्यात येते की, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची **दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती** योजनेच्या महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर योजनेची माहिती खालीलप्रमाणे,

## ❖ टॉप क्लास एज्युकेशन ( Top Class Education ) शिष्यवृत्ती योजना ::

सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली तर्फे दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग यांनी दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण ( पदवी व पदव्युत्तर ) घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता **दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना** ( Scholarship For Top Class Education for Students with Disabilities ) ही शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८.०० लाखा पर्यंत** व **दिव्यांगाचे प्रमाण ४० % किंवा त्यापेक्षा अधिक** असावे असे निश्चित करण्यात आलेले आहे.

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून संपूर्ण देशासाठी खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नवीन संच निर्धारीत करण्यात आला आहे.

- शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) –

**संदर्भ क्र.२ च्या मार्गदर्शिकेच्या परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्यानुसार,** शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) खालीलप्रमाणे :

| **Sr.No.** | **Scheme** | **Admissibile for Classes / Courses** | **Slots*** | **Parental Income (per annum Ceiling)** | **Reservation of slots for female candidates **** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Top Class Education | Graduate and Post-graduate Degree / Diploma in institutes notified by DEPwD | 300 (including renewal cases) | Rs.8.00 lakhs | 50 % |

* Slots for **Top Class schemes** include Fresh as well as Renewal cases . Fresh cases will be considered only againt the left over slots after processing all the Renewal cases .Thus ,mere fulfilling the eligibility criteria will not entitle grant of scholarship due to fixed number of slots in a year.

** In case adequate number of Female candidates are not available or not found eligible as per the terms and conditions of the scheme,the unutilized slots will be utilized by selecting suitable male candidates.

- **शिष्यवृत्ती रक्कम :-**

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे. **तसेच शिष्यवृत्तीसाठी संदर्भ क्र.२ च्या मार्गदर्शिकेच्या परिच्छेद क्र.३.१ मध्ये नमूद केल्यानुसार, विद्यार्थ्याला बायोमॅट्रीक ऑथेन्टिकेशन करावे लागणार.**

| **Sl. No.** | **Components of Scholarship** | **Components of Scholarship** |
|---|---|---|
| a) | Reimbursement of tuition fees and non-refundable charges paid/ payable to the Institute | Up to Rs. 2.00 lakh – per annum (subject to actual amount). |
| b) | Maintenance Allowance | Rs.3,000/- per month for hostellers,<br>Rs. 1,500/- per month for day-scholars |
| c) | Special Allowances (related to types of disabilities like reader allowance, escort allowance, helper allowance etc.) | Rs. 2,000/- per month |
| d) | Books & Stationery | Rs. 5,000/- per annum. |
| e) | Reimbursement of expenses for purchase of a computer/ laptop with accessories. | Rs. 45,000/- as a one time grant in the first year of the course.<br>(For getting the benefit, student has to submit requisite documents viz., bill/receipt as proof of purchase of the Laptop/Computer ) |
| f) | Reimbursement of expenses for purchase of Aids and Assistive devices relating to the particular disability of the selected candidates. | Rs. 30,000/- as a one time grant in the first year of the course.<br>(The reimbursement is made based on the requisite documents viz., bills/vouchers submitted by the students to ensure genuineness of the claim.) |

उपरोक्त योजनेची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाच्या संकेतस्थळावर ( संकेतस्थळ - www.disabilityaffairs.gov.in ) / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजनेची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येईल.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येतात. **सन २०२३-२४ करिता** सदर योजनेच्या लाभासाठी, प्रवेशित विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) अर्ज व **सन २०२२-२३ मध्ये शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नूतनीकरण** ( Renewal ) अर्ज भरतेवेळी, **विद्यार्थ्यांनी स्वत:च्या आधार क्रमांकाची नोंद करुन** ( जर आधार क्रमांक नसेल तर **आधार रजिस्ट्रेशन क्रमांकानुसार** ) NSP पोर्टलवर खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या करावे ( अर्ज करण्यापूर्वी मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी NSP पोर्टलवर सदर योजनेसाठी उपलब्ध User Manual / Guideline चा वापर करावा.)

तसेच, संस्थांनी NSP पोर्टलच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करावी.

| विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे वेळापत्रक :: शै. वर्ष २०२३-२४ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कार्यवाही | अंतिम दिनांक |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३१ डिसेंबर, २०२३ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करणे. | एनएसपी पोर्टलवर जाहिर होणाऱ्या दिनांकानुसार |
| **टीप :: केंद्र शासनाकडून वेळापत्रकात काही बदल झाल्यास सदर बदल एनएसपी पोर्टलवर ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.** | | |

**महत्त्वाची सूचना-**

१. संस्थांनी एनएसपी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अद्ययावत करावी. तसेच **शै. वर्ष २०२३-२४ पासून संस्थेच्या एनएसपी पोर्टलवर नोंदणी असलेल्या, Head of Institute ( HOI ) व Institute Nodal Officer ( INO) यांचे Bio_Authentication अनिवार्य केलेले आहे.**
२. संस्थांनी उपरोक्त योजनेबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून द्यावी व पात्र विद्यार्थ्याला अर्ज भरण्यासाठी आवश्यक सर्व सहकार्य करावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या अर्ज भरण्यापासून वंचित राहाणार नाही.
३. विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी.
४. संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज जर तपासणीच्या अंतिम मुदतीनंतर संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास **किंवा**
५. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन - दोन शिष्यवृत्ती योजनांचा ( केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा ) लाभ प्राप्त करुन घेतल्यास **किंवा**
६. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास **किंवा**
७. संस्थेमध्ये TFWS अंतर्गत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

सही/-
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

प्रत -. यांना माहितीसाठी सविनय सादर.

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई.
२. मा. आयुक्त,अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र शासन, ३ चर्च रोड, पुणे -४११ ००१.( Email-Id : commissioner.diability@maharashtra.gov.in; commissioner_disability@yahoo.co.in )
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर ( Email id- rooffice@dtemaharashtra.gov.in )
४. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई-४०० ००१ ( Email id- dmercetcell@gmail.com ; dmerps@gmail.com )
५. मा. संचालक, आयुष संचालनालय, चौथा माळा, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई-४०० ००१ ( Email id- directorayurvedmaha@gmail.com )
६. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१ (Email id - schol.dhepune@gov.in )
७. मा. संचालक, कला संचालनालय,सर जे जे स्कूल ऑफ आर्ट कॅम्पस, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई-०१ (Email Id - dirdoa.mum_mah@gov.in )
८. मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे -४११ ०३७. ( Email Id- edn_mcaer@rediffmail.com; mcaer@rediffmail.com; jtdirector_admin@mcaer.org )

९. प्रत — खालील यादीतील सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात येते की, जाहिर वेळापत्रकानुसार न चुकता उपरोक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी कार्यवाही पूर्ण करण्याबाबत ...

**List of Notified Institutes of Excellence in Education of Maharashtra State for Top Class Education for Students with Disabilities scheme ( For details refer the Guidline of scheme on NSP Portal )**

| Sr.No. | Name of Institute | Location | District |
|---|---|---|---|
| 1 | Indian Institute of Technology, Bombay. | Powai, Mumbai. - 400 076. Maharashtra. | Mumbai Suburban |
| 2 | Visvesvaraya National Institute of Technology, Nagpur | South Ambazari Road, Nagpur- 440010. | Nagpur |
| 3 | Indian Institute of Information & Technology, Pune. | Village Nanoli, Tehsil-Mawa, Dist- Pune. | Pune |
| 4 | National Institute of Industrial Engineering, Mumbai. | Vihar Lake Marg, Near The Residence Hotel, Aarey Powai Road,Goregaon, Mumbai-400087 Maharashtra. | Mumbai Suburban |
| 5 | Indian Institute of Management, Nagpur. | South Ambazari Road, Ambazari, Nagpur- 440010. Maharashtra<br><br>VNIT Campus, South Ambazari Road, Ambazari, Nagpur- 440010. Maharashtra | Nagpur |
| 6 | National Institute of Industrial Engineering( NITIE), Mumbai. | Vihar Lake Marg, Near The Residence Hotel, Aarey Powai Road, Goregaon, Mumbai-400087 Maharashtra. | Mumbai Suburban |
| 7 | SYMBIOSIS Institute of Business Management, Pune. | Senapati Bapat Road, Pune - 411 004. | Pune |
| 8 | Narsee Monjee Institute of Management Studies, Mumbai. | V.L. Mehta Road, Vile Parle (W), Mumbai-400056. | Mumbai Suburban |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | Bharati Vidyapeeth, Pune | LBS Road, 13 Sadashiv Peth, Next to Alka Talkies, Pune, 411030<br>Maharashtra. | Pune |
| 10 | S.P. Jain Institute of Research & Mgt. Mumbai. | Inside Bhavans College Campus, Munshi Nagar, Dadabhai Road, Andheri West, Mumbai-400058,Maharashtra. | Mumbai Suburban |
| 11 | Jamnalal Bajaj Institute, Mumbai. | Jamnalal Bajaj Institute, Mumbai.<br>164, Backbay Reclamation, H.T. Parekh Marg, DN House, Church Gate, Mumbai- 400020<br>Maharashtra | Mumbai City |
| 12 | ILS Law College, Pune | Law College Road, Pune- 411004 | Pune |
| 13 | SYMBIOSIS Law College, Pune. | Senapati Bapat Road,Wadervadi, Pune. | Pune |
| 14 | Grant Govt. Medical College, Mumbai. | Sir J J Hospital, Byculla, Mumbai-400008. | Mumbai City |
| 15 | King Edward Memorial Hospital, Mumbai. | Acharya Donde Marg, Parel, Mumbai- 400012. | Mumbai City |
| 16 | Padmashree Dr. D.Y. Patil Vidyapeeth, Nerul, Mumbai. | Sector 7, Nerul, Navi Mumbai – 400706 | Thane |
| 17 | Central Institute for Research of Cotton Technology, Mumbai | Adenwala Road, Matunga, Mumbai-400019. | Mumbai City |
| 18 | National Institute of Fashion Technology, Mumbai. | NIFT Campus Plot No. 15, Sector - 4, Kharghar, Navi Mumbai - 410 210. | Raigad |
| 19 | Institute of Hotel Management, Catering Tech. & Applied Nutrition, Mumbai. | Veer Sawarkar Marg, Dadar (W) Mumbai- 400028. | Mumbai City |
| 20 | B.V. Institute of Hotel Management & Catering Technology, Mumbai | Sector-8, CBD, Navi Mumbai- 400614. | Thane |
| 21 | B.V. ( Bharati Vidyapeeth's ) Instt. Of Hotel Mgmt. & Catering Tech. , Pune. | Katraj - Dhanakavdi, Pune - 411 043. | Pune |
| 22 | All India Shri Shivaji Memorial Institute of Hotel Mgmt & Catering Tech., Pune. | 55/56, Shivaji Nagar, Pune.- 411 005 | Pune |
| 23 | Ali Yavar Jung Nationla Institute for the Hearing Handicapped, Mumbai. | Kishan Chand Marg, Bandra(West), Mumbai-400050. | Mumbai Suburban |
| 24 | Indian Institute of Science Education & Research, Pune. | Dr Homi Bhabha Rd, Ward No. 8, NCL Colony, Pashan,<br>Pune- 411008. | Pune |
| 25 | Tata Institute of Social Science, Mumbai. | PO Box 8313, Deonar, Mumbai - 400088. | Mumbai Suburban |
| 26 | Film & Television Institute of India, Pune. | Law College Road, Pune- 411004 | Pune |